वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

अ.क्र.	तपशील		सविस्तर माहिती
१	पीक/वाणाचे नाव		**खरीप ज्वारी : पी.व्ही.के. ८०९**
२	प्रसारीत केल्याचे वर्ष		२००२
३	प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ		वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
४	जमीन		मध्यम ते भारी जमीन व पाण्याचा निचरा होणारी
५	हवामान		समशीतोष्ण व कोरडे
६	पेरणी/लागवडीचा कालावधी		जून ते जुलैच्या पहिल्या आठवडयापर्यंत
७	प्रती एकर बियाणे		४ किलो / एकर
८	पीक व्यवस्थापन		
	१	लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन	**पेरणीचा कालावधी :** जूनचा दुसरा आठवडा ते जुलैचा पहिला आठवडा हा खरीप ज्वारी लागवडीसाठी योग्य कालावधी आहे. **बियाण्याचे प्रमाण :** सुधारीत वाणासाठी हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे. **बीजप्रक्रिया :** अझोटोबॅक्टर जीवाणूसंवर्धक, स्फुरद विद्राव्य जीवाणूसंवर्धक २५० ग्रॅम प्रती ८ ते १० किलो बियाण्यास याप्रमाणे बीजप्रक्रिया केल्यास उत्पादनात वाढ होते.
	२	खत व्यवस्थापन	• पिकाच्या योग्य वाढीसाठी व अधिक उत्पादनासाठी हेक्टरी १० टन शेणखत टाकुन वखराच्या पाळीने मातीत चांगले मिसळुन द्यावे. • खरीप ज्वारीस ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश प्रती हेक्टरी शिफारस केली आहे. • त्यापैकी पेरणी करतांना अर्धे नत्र, संपुर्ण स्फुरद व संपुर्ण पालाश द्यावे. उरलेले अर्धे नत्र पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी ८५ किलो युरियाद्वारे द्यावे.
	३	पाणी व्यवस्थापन	खरीप हंगामामध्ये जर पावसाचा कोरडा कालावधी (खंड) एक महिन्यापेक्षा जास्त झाला तर एक किंवा दोन संरक्षीत पाण्याच्या पाळया द्याव्यात.
	४	कीड व्यवस्थापन	**खोडमाशी** निंबोळी अर्क ५ टक्केची फवारणी करावी किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के प्रवाही, २० मिली./ १० लीटर पाणी किंवा ऑक्सीडेमेटॉन मीथाइल २५ टक्के प्रवाही, २० मिली / १० लीटर पाणी **खोडकिडा**

			• निंबोळी अर्क ५ टक्केची फवारणी करावी किंवा • क्विनॉलफॉस २५ टक्के प्रवाही, २० मिली / १० लीटर पाणी **लष्करी अळी :-** प्रादुर्भाव आढळुन आल्यास क्विनॉलफॉस २५ टक्के प्रवाही, २० मि. ली. १० लीटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. गरज भासल्यास पहिल्या फवारणीच्या १५ ते २० दिवसांनी दुसरी फवारणी करावी. **मावा (चिकटा) :** खालीलपैकी एका कीटकनाशकाची दिलेल्या मात्रेप्रमाणे १० लीटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. डायमेथोएट ३० टक्के प्रवाही, १० मि. ली. इमीडॅक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही, ३ मि. ली. **मीज माशी :** प्रादुर्भाव ५ ते ६ माशा प्रती कणीस आढळुन येताच मॅलाथिऑन ५ टक्के भुकटी प्रती हेक्टरी २० किलो प्रमाणे धुरळावी. धुरळणी करण्याच्या वेळी ९० टक्के कणसे पोंग्याच्या बाहेर पडलेली असावीत किंवा क्विनॉलफॉस २० टक्के प्रवाही किंवा मॅलाथीऑन ५० टक्के प्रवाही २० मिली प्रती १० ली. पाण्यात मिसळुन फवारणी करावी. **कणसातील अळया** प्रादुर्भाव दिसुन येताच खालीलपैकी एका कीटकनाशकाची मॅलाथीऑन ५ टक्के २० किलो प्रती हेक्टरी प्रमाणे धुरळणी करावी. क्विनॉलफॉस २० टक्के प्रवाही किंवा मॅलाथीऑन ५० टक्के प्रवाही २० मिली प्रती १० ली. पाण्यात मिसळुन फवारणी करावी.
	५	**रोग व्यवस्थापन**	**दाण्यावरील बुरशी :** रोगास प्रतीकारक्षम जातीची पेरणीसाठी निवड करावी. पिकाची काढणी कायीक पक्वता अवस्था असताना करावी व त्वरित वाळवावे. पीक ५० टक्के फुलोरा अवस्थेत असताना फक्त बीजोत्पादन ज्वारीवरती प्रोपिकोनॅझोल या बुरशी नाशकाची ०.१ टक्के या प्रमाणात फवारणी करावी. **कणसावरील चिकटा :** पेरणीपुर्वी बियाणे ३० टक्के मिठाच्या द्रावणात (३ किलो मीठ प्रती १० लीटर पाणी) टाकावे व पाण्यावर तरंगणारे हलके व पोचट, रोग पेशीयुक्त बियाणे काढुन बाजुला करावे तद्नंतर बियाणे स्वच्छ पाण्यात धुवून, वाळवून पेरणीसाठी वापरावे. **ज्वारीवरील केवडा रोग / गोसावी :** केवडा प्रतीबंधक ज्वारीच्या वाणांची निवड करावी. मेटालॉक्झील (३५ टक्के) ६ ग्रॅम / किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करुन पेरणी करावी.
९	**पिकाचा कालावधी**		११५-१२० दिवस
१०	**उत्पादकता**		धान्य ३२-३५ क्विंटल / हेक्टर कडबा ११५-१२० क्विंटल / हेक्टर

११	**वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म**	१. धान्य व कडबा दुहेरी जास्त उत्पन्न असलेला वाण २. दाण्यावरील बुरशी रोगाला सहनशील ३. उंच वाढणारा
१२	**वाणासंबंधीचे छायाचित्रे**	